# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF) | UGC Approved Sr. No. 64310

**SPECIAL ISSUE**

(20 Sept. 2017) Volume I, Issue-I


On the Occasion of ICSSR SPONSORED

One Day National Conference On

# ROLE OF PANCHAYAT RAJ IN RURAL DEVELOPMENT IN INDIA

**Organized by**

**Department of Public - Administration, Vasundhara College, Ghatnandur**

**Tq. Ambajogai, Dist. Beed (M.S.)**




**Editor in Chief**

**Mr. Arun Godam**

**Guest Editors**

**Principal Dr. Arun Dalve**

Vasundhara College, Ghatnandur

Tq. Ambajogai, Dist. Beed (MS)

**Assit. Prof. S.D. Dixit**

Head Dept. of Public Administration

Vasundhara College, Ghatnandur

**Assit. Prof. H.W. Jadhav**

Dept. of Public Administration

Vasundhara College, Ghatnandur



www.rjournals.co.in

Role of Panchayat Raj in Rural Development in India
(183) CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol I Issue I, 20 Sept. 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

(62)

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची ग्रामीण आरोग्य विकासातील भूमिका

प्रा. जाधव अशोक काकासाहेब
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी

राम गेले, कृष्ण गेले, पांडवही गेले ।
ऐसे गेले कोट्यानुकोटी !
काय रडू मी एकासाठी
खंत तरी कोनाकोनाची करावी?

संत गाडगेबाबा

सद्यस्थितीत महाराष्ट्रातील बहुतांश खेड्यातून उघड्यावर साचलेले सांडपाणी व उघड्यावर शौचास जाणे ह्या महत्वाच्या आरोग्य विघातक समस्या आहेत. त्यामुळे सांडपाण्याची योग्य व्यवस्था लावणे, उघड्यावीरल शौचविधीस प्रतिबंध करणे हे ग्रामीण आरोग्य दृष्ट्या महत्वाचे ठरते. राष्ट्र व समाज विकासात अनेक संत व समाजसुधारकांचे योगदान महत्वाचे ठरलेले आहे. यात संत गाडगेबाबांचे योगदान मोलाचे आहे. ग्राम स्वच्छतेशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही असे गाडगेबाबांनी आपले विचार व भावना सातत्याने समाजापुढे मांडल्या. शेती व खेडे याला सर्वगुण संपन्न करावयाचे असेल तर शहरी विकासाबरोबर ग्रामीण विकास महत्वाचा ठरतो. कारण आपल्या देशात लाखो खेडे, वाड्या, तांडे यात सामान्य जनता वास्तव्य करते.

२०११ च्या जनगणनेनुसार ६७% पेक्षा जास्त ग्रामीण भागातील लोक शौचालयाचा वापर करीत नसल्याचे दिसून येते. जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफच्या २०१२ च्या अहवालानुसार जगातील उघड्यावर शौचास जाणाऱ्या लोकांमध्ये ६०% भारतीय नागरिकांचा समावेश आहे. इ. स. २०१५ मधील माहितीनुसार महाराष्ट्रातील ३८% कुटूंबाकडे शौचालयाची उपलब्धता आहे. तर ६२% कुटूंब उघड्यावर शौचास जातात.

**उद्देश-** सदर शोधनिबंध खालील उद्देशाला अनुसरुन लिहीण्यात आला आहे.
१) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे महत्व विशद करणे.
२) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे उद्देश पहाणे.
३) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती -**प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिक वर्तमानपत्रे व संकेतस्थळे याचा वापर करण्यात आलाआहे.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे उद्देश**

महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतीचे क्षेत्र उघड्यावरिल शौचविधीपासून मुक्त किंवा हगणदारी मुक्त करण्यासाठी शासनाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची सुरूवात केली. या अभियानाचे उद्देश पुढील प्रमाणे आहे.

१) राज्यातील ग्रामीण भाग हगणदारीमुक्त करणे.
२) ग्रामीण नागरिकांचे आरोग्यमान व जीवनमान उंचावणे.
३) वैयक्तिक शौचालय बांधकाम व वापरास चालना देणे.
४) आरोग्यदृष्ट्या शौचालयाच्या महत्वाविषयी जनजागृती करणे.
५) ग्रामीण समाजाला स्वच्छतेतून समृध्दीकडे घेऊन जाणे.
६) महिलांची कुचंबना थांबविणे, त्यांच्या मान सन्मानात भर घालणे.
७) आंगणवाडी व शाळेतील मुला-मुलींच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाडी व शाळेत स्वच्छता सुविधा निर्माण करणे.